"अनुसूचीत जातीतील महिलांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांचा अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

(सामाजिकशास्त्रे विद्याशाखातंर्गत समाजकार्य विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा)

संशोधक

इंगोले दयानंद रविंद्रनाथ

एम. एस. डब्लू., नेट, सेट.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. गवई संजय

सहाय्यक प्राध्यापक समाजकार्य विभाग,
बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र प्रशाळा,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

जानेवारी २०१८

“अनुसूचीत जातीतील महिलांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांचा अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा”

प्रस्तावना :

आदिम काळामध्ये स्त्रि-पुरुष असा भेदभाव नव्हता व स्त्री-पुरुष श्रम विभाजन झालेले नव्हते. परंतु काळाच्या ओघामध्ये स्त्रियांनी घरकाम स्वीकारले तर पुरुषांनी घराबाहेरील कामे स्विकारली, उदा. फळे, कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे इ. त्यामुळे स्त्रियांच्या श्रमाला मुल्य विरहीत श्रम मानले जाऊ लागले, तर पुरुषांच्या श्रमाला महत्त्व प्राप्त झाले. पितृसत्ताक समाजव्यवस्था ही मातृसत्ताक समाज व्यवस्थेच्या ठिकाणी प्रस्तापित झाली, त्यामुळे पितृसत्ताक विचारसरणीने स्त्रियांवर आपली अधिसत्ता कायम टिकवून ठेवण्यासाठी प्रथा, परंपरा, चालीरिती, लोकनिती, मुल्य, प्रमाणके, धर्मसंस्था आणि सामाजिक व्यवहार प्रस्थापित केले. त्यामुळे उत्तर वैदिक काळापासून स्त्रियांवर दुय्यमत्व, अन्याय, अत्याचार हे एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत कायम टिकून राहीले. एकोणीसाव्या शतकामध्ये मात्र ब्रिटीश शासन व्यवस्थेने लोकांना शिक्षणाची संधी मिळवून दिली. त्यामुळे समाजामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, हक्क, कर्तव्य याची जाणीव झाली. याच पार्श्वभूमीवर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, रामास्वामी पेरियार, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, ताराबाई शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजसुधारक उदयास आले. यांनी लिंगभेद, जातीभेद, सामाजिक विषमता व अस्पृश्यतेच्या विरोधात संघर्ष उभा केला. त्यामुळे आधुनिक काळात महिलांना समता, स्वातंत्र्य, न्याय, हक्क प्राप्त करण्याची संधी मिळत आहे, परंतु तरीही अनुसूचीत जातीतील अनेक महिला लिंगभेद, जातीभेद, सामाजिक राजकीय, शैक्षणिक विषमतेला सामोरे जात आहेत.

अनुसूचीत जातीतील स्त्रिया सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रश्नाबरोबर त्यांच्यावर होणाऱ्या जातीय अत्याचाराने अधिक पिडित आहेत. स्त्रियांच्या समस्यांची वर्गवारी केली तर ढोबळमानाने सवर्ण जातीच्या स्त्रियांचे आणि अनुसूचीत जातीतील स्त्रियांचे प्रश्न असा ठळकपणे फरक दिसून येतो. सवर्ण स्त्रिया आणि अनुसूचीत

जातीतील स्त्रिया, यांच्या समस्याची तिव्रता निरक्षणाद्वारे पाहिली असता अनुसूचीत जातीतील स्त्रिया ह्या पितृसत्ता, लिंगभाव या बरोबर जातीय व्यवस्थेच्या अत्याचाराने देखिल पिडीत आहेत. आजपर्यंतच्या अनुसूचीत जातीतील स्त्रियावरील अत्याचाराचे अवलोकन केले असता, अनुसूचीत जातीतील स्त्रिया ह्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दुबळेपणामुळे विविध अत्याचाराला बळी पडतात. हा दुबळेपणा त्याच्यावर जातीव्यवस्था आणि पितृसत्तेने लादलेला आहे. त्यामुळे अनुसूचीत जातीतील स्त्रियावर लिंगभावजनित व जातीय असे दुहेरी अत्याचार घडत आहेत. भारताच्या लोकसंख्येच्या १६% लोकसंख्या ही अनुसूचित जातीची असून बहुसंख्य लोक हे भूमिहीन व असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगार आहेत. त्यामुळे अनुसूचीत जातीतील लोकांना उच्चवर्णीय लोकांच्या रोजगारावर अवलंबून रहावे लागते व उच्चवर्णीय लोक त्यांना वाटतील ती कामे त्यांच्याकडून करून घेतात. त्यामुळे अनुसूचीत जातीतील स्त्रीला तीच्या कुटूंबातील अत्याचारासह सवर्ण जातींकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला सामोरे जावे लागते.

अनुसूचीत जातीतील स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध उपाययोजना केल्या असल्या तरीही अनुसूचीत जातीतील स्त्रिया ह्या सर्वच बाबतीत मागासलेल्या व उपेक्षीत, नागरी हक्कापासून वंचित राहिलेल्या आहेत, तसेच त्यांना अप्रतिष्ठा, अपमान, गांजवणूकीला तोंड द्यावे लागते. जातीय अत्याचारांतर्गत त्यांना केवळ मालमत्तेलाच नव्हे तर जिवितालाही मुकावे लागल्याच्या अनेक जघन्य घटना घडत आहेत. आजही खैरलांजी व जवखेडासारख्या माणुसकिला काळीमा फासवणाऱ्या हत्याकांडांच्या घटना घडत आहेत. अनुसूचीत जातीतील लोकांची घरे जाळणे, त्यांच्या हत्या करणे, त्यांच्या स्त्रीयांवर बलात्कार करणे, त्यांचा लैंगीक छळ करणे, त्यांच्यावर सामुहीक हल्ले करणे व शारीरिक इजा पोहचवणे असे अत्याचार आजही थांबलेले नाहीत.

अनुसूचीत जातींमधील शिक्षणाच्या प्रसारामुळे जाणीवेची एक नवी लाट निर्माण झाली आहे, तीचा परिपाक म्हणून अनुसूचीत जातीगट आपल्या मुलभूत हक्काविषयी आपली मते समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न करत आहेत, याकडे अन्य समाजाचा दृष्टीकोन सहानुभूतीचा किंवा समंजस्याचा नाही. ज्या ज्या वेळी अनुसूचीत जातींनी आपल्या हक्कांची मागणी केली,

अस्पृश्यतेला विरोध केला. कायद्यानुसार किमान वेतनाची मागणी केली. बळजबरीने लादलेली वेठबिगारीची कामे करण्यास नकार दिला. त्या त्या वेळी त्यांचे हितसंबंध ज्या समाजामध्ये गुंतलेले आहेत असा बलिष्ठ, प्रभावी वर्ग सत्तेच्या बळावर त्यांना नमवू पहातो व त्यांना आपल्या दडपणाखाली ठेवू पाहतो. ज्या ज्या वेळी अनुसूचीत जातीगटांने आपल्या आत्मसन्मानाचे, आपल्या स्त्रीयांचया अब्रूचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला, त्या त्या वेळी ते समाजातील प्रभावी बलीष्ठ वर्गाचा प्रखर क्रोध आपल्यावर ओढवून घेतला आहे. अलिकडील काळात अनुसूचीत जातीतील लोकांना मानवी विष्टेसारखे अखाद्या पदार्थ खाण्यास भाग पाडणे, अनुसूचीत जातीतील निराधार महिलेवर सामुहीक हल्ले चढवणे, हत्या करणे, बलात्कार करणे, अनुसूचीत जातीतील महिलाची नग्न धिंड काढणे यासारख्या अत्याचार करण्याचा समाजघातक कल वाढीस लागला आहे. अशा परिस्थितीमध्ये नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ यासारखे प्रचलीत कायदे व भारतीय दंडसंहितेतील तरतुदी ह्या आपुऱ्या असल्याचे आढळून आले आहे. म्हणून अनुसूचित जाती-जमाती अत्याचारास प्रतिबंध अधिनियम १९८९ हा कायदा अनुसूचित जाती-जमातीच्या नसलेल्या व्यक्तीकडून अनुसूचित जाती-जमातीच्या असलेल्या व्यक्तीवर केल्या जाणाऱ्या अत्याचारास आळा घालणे व त्या व्यक्तीला अत्याचारापासून परावृत्त करणे यासाठी अस्तित्वात आला. परंतू अनुसूचीत जातींवरील अत्याचारास पूर्णपणे आळा बसलेला नाही, त्यामुळे सवर्णाकडून होणाऱ्या विविध अत्याचारास अनुसूचीत जातीगट व अनुसूचीत जातीतील स्त्रिया बळी पडतांना दिसून येतात.

संशोधन विषयाची निवड :

संशोधन कार्याला सुरुवात करण्यासाठी संशोधकाला संशोधन विषयाची निवड करणे आवश्यक असते, ज्यामुळे संशोधनाला एक निश्चित दिशा प्राप्त होते. सामाजिकशास्त्रांमध्ये विषय निश्चितीला समस्यासुत्रण असे म्हणतात. विषयाची निवड सहजपणे होत नाही, तर संशोधकाला एखांद्या घटनेची कारणमिमांसा करण्याची जिज्ञासा निर्मान झाल्यानंतर तो संशोधन विषयाची निश्चिती करतो. अनुसूचीत जातीतील महिलावर होणारा जातीय अत्याचार हा अधिक आहे, हा अत्याचार त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक विकासास बाधक आहे. म्हणून अनुसूचीत जातीतील महिलांवरील होणाऱ्या जात्याधारीत अत्याचारांचे

स्वरूप, तिव्रता, कारणे, परिणाम व कायद्याने दिलेले संरक्षण त्यामुळे त्यांच्यावरील अत्याचारांच्या स्थितीत झालेला बदल अभ्यासण्याच्या उद्देशाने संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे. त्यानुषंगाने **"अनुसूचीत जातीतील महिलांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांचा अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा"** हा विषय संशोधनाकरिता निवडण्यात आला आहे.

संशोधन विषयाचे क्षेत्र :

प्रस्तुत विषयाची व्यापकता लक्षात घेता यास क्षेत्रीय मर्यादा घालणे गरजेचे ठरते. त्यानुषंगाने अनुसूचीत जातीतील महिला वरिल जातीय अत्याचार हे मागासक्षेत्राशी अधिक निगडीत असल्यामुळे तसेच हिंगोली जिल्हा या क्षेत्राची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची व्याप्ती :

एकूणच अनुसूचीत जातीतील महिलांवर होणारे अत्याचारांमध्ये अधिक आहेत. त्यामध्ये जातीय अत्याचाराचे प्रमाण लक्षात घेता महिलांवर होणारे अत्याचार व्यापक स्वरूपात दिसुन येतात. त्यामुळे प्रस्तुत विषयाची व्याप्ती अनुसूचीत जातीतील महिलावर होणाऱ्या जातीय अत्याचाराच्या संदर्भात ठरविण्यात आली आहे. त्यामध्ये शारिरीक व मानसिक तसेच सामाजिक, राजकिय, आर्थिक, शैक्षनिक आणि सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा :

प्रस्तुत विषयाची मर्यादा ठरवत असतांना अनुसूचीत जातीतील महिलांवर होणारे अत्याचार हे अधिक असल्यामूळे केवळ अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या अनुसूचीत जातीतील महिलांवरील अत्याचारांचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे अनुसूचीत जातीतील महिलांवर होणरे इतर अत्याचार प्रस्तुत विषयाच्या कक्षेत येत नाहीत. त्याचबरोबर काळ मर्यादा ठरवत असतांना जातीय अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या गुन्ह्याचे प्रमाण लक्षात घेता २००५ ते २०१५ हा दहा वर्षाचा कालावधी अभ्यासासाठी निश्चित करण्यात आलेला आहे.

संशोधनाचे महत्त्व :

भारतात प्रत्येक राज्यात जेथे अनुसूचीत जाती वास्तव्य करतात तेथे आजही अमानुष जातीय अत्याचारांना अनुसूचीत जाती व अनुसूचीत जातीतील महिला बळी पडत आहेत. त्यास महाराष्ट्र राज्य अपवाद नाही. महाराष्ट्रात अनुसूचीत जातीतील महिलांना सवर्णाकडून बलात्कार, विनयभंग, जातीयवाचक शिवीगाळ, सार्वजनिक हल्ले, अपमान, लैंगिक छळ, मारहाण, हत्या अश्या अत्याचारांना बळी पडावे लागते. त्यामुळे असे अत्याचार थांबविण्यासाठी राज्यघटनेत विविध तरतुदी करण्यात आल्या आणि त्यानुषंगाने कायदे करण्यात आले. या माध्यामातून अनुसूचीत जातीवरील अत्याचाराला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु अनुसूचीत जातींवर होणाऱ्या अत्याचारांची तिव्रता कमी झालेली दिसून येत नाही. त्यामुळे अनुसूचीत जातीतील महिलांवर होणाऱ्या जातिय अत्याचारांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषय **“अनुसूचीत जातीतील महिलांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांचा अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा”** हा महत्वाचा ठरतो.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. अनुसूचित जाती -जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ संदर्भातील अनुसूचीत जातीतील महिलांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराचे स्वरुप अभ्यासणे.

२. हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचीत जातीतील महिलांवर होणऱ्या जातीय अत्याचारांच्या कारणांचा व परिणामांचा अभ्यास करणे.

३. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ विषयीची समाजामधील जाणीव जागृती अभ्यासणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये :

संशोधकाच्या पूर्वज्ञान, अनुभव आणि विचार संशोधन विषयाची निश्चिती करतांना महत्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे संशोधन विषयासंदर्भात काही अनुमान असतात. त्यामुळे संशोधन विषयाला निश्चित दिशा प्राप्त होते. त्यानुषंगाने गृहीतकृत्याची मांडणी केली जाते. प्रस्तुत

विषयाची गृहीतकृत्ये संशोधकाच्या पूर्वज्ञान, अनुभव, विचार आणि अध्ययनातून मांडण्यात आली आहेत.

१. अनुसूचीत जातीतील महिलांवर होणाऱ्या जातीय अत्याचारांमध्ये लैगिक अत्याचारांचे प्रमाण अधिक आहे.
२. हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचीत जातीतील महिला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, दृष्ट्या मागासलेल्या असल्यामुळे लिंगभेदासह जातीय अत्याचारांना बळी पडतात.
३. पीतृसत्ताक व जातीप्रधान समाज रचनेमूळे हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचीत जातीतील महीला लैगीक अत्याचारास बळी पडतात.
४. समाजामध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या विषयी पुरेसे ज्ञान नाही.

संशोधन आराखडा :

सामाजिक संशाोधन करीत असताना संशोधनाचा आराखडा आखणे आवश्यक असते. संशोधकाला संशोधन विषयाची निश्चिती, संशोधांचे उद्देश, व्याप्ती, संशोधनाचा कालावधी, संशोधनाचे महत्व, नमुना निवड पध्दती, तथ्यसंलनांचे तंत्र, तथ्य विश्लेषण पध्दती, संशोधनात येणाऱ्या मर्यादा आणि अडथळे यांचा विचार करावा लागतो. या सर्व घटकांचा विचार प्रस्तुत संशोधात केला आहे. या अधारे संशोधन कोणत्या अराखडयानूसार केले जाणार आहे. याची निश्चिती करावी लागते. त्यानुषंगाने प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा उपयोगात आणला जाणार आहे.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनाकरिता संभाव्य आणि गैरसंभाव्य नमुना निवड पध्दतीपैकी गैरसंभाव्य नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन विषयासाठी गैरसंभाव्य नमुना निवड पध्दती अंतर्गत उद्देशपुर्ण नमुना निवड पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे.

तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक व दुय्यम या दोन्ही प्रकारच्या तथ्यसंकलनाचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्य म्हणून संशोधन करता स्वतः अध्ययन क्षेत्रात जाऊन

विषयासंदर्भातील तथ्य संकलन अनुसूचीच्या सहाय्याने करणार आहे. त्याच बरोबर दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग देखिल केला जाणार आहे.

प्रकरण योजना :-

१. प्रस्तावना

२. संशोधन पध्दती

३. हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचीत जाती

४. अनुसूचीत जातीतील महिलावर होणाऱ्या जातीय अत्याचारांचे स्वरुप व कारणे

५. ऑट्रॉसिटी कायद्याची अंमलबजावणी व मर्यादा

६. निष्कर्ष आणि सूचना

संदर्भ सुची :

१. ॲड. हानवते अरविंद एम., अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, अशोक ग्रोवर ॲान्ड कंपनी लॉ बुक सेलर्स पबलिशर, २०१५

२. डॉ. तेलतुम्बडे आनंद, मराठवाड्यातील दलीतांवरील अत्याचार, सुगावा प्रकाशन, पुणे, २००३.

३. डॉ. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

४. डॉ.मुरुगकर लता, दलित पँथर चळवळी, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५.

५. शेर निलकंठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित वैचारीक विनिमय, सुविद्या प्रकाशन, २००५.

६. महर्षी शिंदे वि. रा., भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, कौशल्या प्रकाशन, औरंगाबाद,२००३.

७. डॉ. दहिवले स. मो., खैरलांजी पुर्वास्पृश्य अधिकाऱ्यांची संवेदनशीलता, सुगावा प्रकाशन, पुणे, २००९.

८. मून मिनाक्षी (संपा.), फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर, २०११.

९. डॉ. आंबेडकर बी. आर., जातीसंस्थेचे उच्चाटन, निऋती प्रकाशन, औरंगाबाद.

१०. Ankodia H. Crime and violence against Dalit women, Subline Publication, Jaipur, 2013.

११. Chanchreek T. K., Dalit in India (Past and Present), Shri Publication, New Delhi, 2010.

१२. National commission for Scheduled Castes A handbook, 2009.

१३. Atrocities on Dalits in Maharashtra – Fact Finding Report -2008- 2009, Manuski Centre Pune, 2009.

१४. Ram, Ahuja Social Problems in India, Ravat Publication, Jaipur, 2003.

१५. Singh A. K. Crimes against Dalit Women, DPS Publishing House, Delhi, 2011.

१६. Addressing Violence against Dalit Women - Insights based on field experiences in Haryana, PRIA, New Delhi

संशोधक विद्यार्थी
इंगोले दयानंद रविंद्रनाथ

मार्गदर्शक
डॉ. एस. डी. गवई
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर